# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 24 September 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २४ सप्टेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- तीर्थक्षेत्र विकासाच्या ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी
- एसटीचं उत्पन्न वाढवण्यासाठी चालक आणि वाहकांना रोख प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय
- श्री तुळजाभवानी देवीच्या नवरात्रापूर्वीच्या मंचकी निद्रेला आजपासून प्रारंभ

आणि

- मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट जारी

****

राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली. यात श्री क्षेत्र पंढरपूर इथला दर्शन मंडप तसंच दर्शन रांग या सुविधेसाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे. या सर्वच ठिकाणची कामे दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत याची काळजी घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी या बैठकीत दिले. नाशिक जिल्ह्यात भगूर इथं स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्क, जळगाव जिल्ह्यात अमळनेर इथल्या मंगळग्रह देवस्थान विकास आराखडा, अमरावती जिल्ह्यात दर्यापूर इथं संत गाडगेबाबा कर्मभूमी ऋणमोचन विकास आराखडा, बीड जिल्ह्यात श्री क्षेत्र गहिनीनाथगड विकास आराखडा, दहशतवादी अजमल कसाबला जिवंत पकडणारे हुतात्मा तुकाराम ओंबळे यांच्या मूळगावी सातारा जिल्ह्यात केंडबे इथं स्मारक उभारण्यास या

बैठकीत मान्यता देण्यात आली. या सर्व कामांसाठी निधीच्या तरतुदीलाही शिखर बैठकीत मंजुरी देण्यात आली. पुणे महानगर विकास प्राधिकरणाच्या ३ हजार ८३८ कोटी ६१ लाखांच्या अर्थसंकल्पालाही या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

****

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या एका धावपट्टीवर ५ ऑक्टोबर रोजी भारतीय वायू दलाचं एक विमान उतरवणं हे सिडकोचं उद्दिष्ट आहे. विमानाच्या भू अवतरणाचा हा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत व्हावा, त्यासाठी पंतप्रधानांना विनंती करणार असल्याचं, सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सांगितलं आहे. शिरसाट यांनी आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची पाहणी केली, त्यानंतर ते सिडको भवनात पत्रकार परिषदेत बोलत होते. विमानतळ उभारणीचं काम अत्यंत समाधानकारक पद्धतीनं सुरू असून, वायू दलाचं विमान धावपट्टीवर उतरल्यानंतर मार्च महिन्यात देशांतर्गत प्रवासी वाहतुक सुरू करण्याचा तर जून महिन्यात आंतरराष्ट्रीय उड्डाणं सुरू करण्याचा सिडकोचा प्रयत्न असल्याचंही शिरसाट यांनी सांगितलं.

****

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांचं आज नागपूर इथं आगमन झालं, रेशीमबाग इथं सुरेश भट सभागृहात त्यांची भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद बैठक होत आहे. दरम्यान अमित शाह आज आणि उद्या छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येत आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ते पक्ष कार्यकर्त्यांशी तसंच अधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज छत्रपती संभाजीनगर इथं येत आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून राज्यभर मोफत सामुदायिक आरोग्य शिबिरं राबवण्यास सुरुवात झाली आहे. या शिबिरांच्या तपासणी दरम्यान मणक्यांशी संबंधित आजारांवर शस्त्रक्रीया करण्यासाठी स्पाईन फाऊंडेशनकडून पुढाकार घेण्यात आला आहे. विविध जिल्ह्यांत मणक्याशी संबंधित आजाराचं निदान झालेल्या रुग्णांवर त्या त्या जिल्ह्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचं, स्पाईन फाऊंडेशनचे विश्वस्त आणि मणक्यांच्या आजारावरील विशेषज्ञ डॉ शेखर भोजराज यांनी सांगितलं आहे.

****

शाश्वत विकास उद्दिष्टपूर्ती बरोबरच भारताला समृद्ध आणि विकसित राष्ट्र बनवण्यासाठी महाराष्ट्राचं योगदान सर्वाधिक महत्त्वाचं ठरत असल्याचं, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. ते दिल्लीत इथं राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या १० व्या परिषदेत बोलत होते. लोकसभा अध्यक्ष आणि राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे भारत विभागाचे प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद "शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासासंदर्भात विधानमंडळांची भूमिका" या विषयावर घेण्यात येत आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरणाचा वेग असलेलं राज्य असल्याने सार्वजनिक वाहतुकीचे विस्तारते जाळे, इलेक्ट्रिक वाहने, सुनियोजित गृहनिर्माण प्रकल्प या मुद्यांकडे नार्वेकर यांनी आपल्या भाषणात उपस्थितांचं लक्ष वेधलं.

****

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचं उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त उत्पन्न आणणारे चालक आणि वाहक यांना एसटीतर्फे रोख प्रोत्साहन भत्ता देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक फेरीच्या उत्पन्नाचं उद्दिष्ट देऊन ते उद्दिष्ट पूर्ण करुन अतिरिक्त उत्पन्न आणणाऱ्या चालक वाहकांना उद्दिष्टापेक्षा वाढीव उत्पन्नापैकी २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून दोघांना सम प्रमाणात वाटण्यात येणार आहे. सदर रक्कम त्यांची कामगिरी संपवून आगारात आल्यानंतर त्याच दिवशी रोख स्वरूपात मिळणार आहे.

****

येत्या दहा नोव्हेंबरला होणाऱ्या टीईटी, अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यासाठी अंतिम मुदत येत्या ३० तारखेपर्यंत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी ही माहिती दिली.

****

तुळजापूर इथल्या तुळजाभवानी देवीच्या मंचकी निद्रेला आजपासून प्रारंभ झाला. आज सायंकाळच्या अभिषेक पूजेनंतर तुळजाभवानी माता शेजगृहातील चांदीच्या पलंगावर विसावली. तत्पूर्वी सेवेकरी पलंगे कुटुंबियांनी मंचकी निद्रेसाठी चांदीचा पलंग स्वच्छ केला. तर आराधी महिलांनी गाद्यांचा कापूस पिंजला. दरम्यान, नऊ दिवसांची मंचकी निद्रा संपवून ३ ऑक्टोबरला घटस्थापनेच्या पहाटे देवी

तुळजाभवानी सिंहासनावर विराजमान होईल. त्याच दिवसापासून शारदीय नवरात्र महोत्सवाची सुरुवात होईल.

****

सोलापूर जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा अंतर्गत मंजूर झालेल्या विविध विकास कामांचं आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलं. एकात्मिक पर्यटन विकास आराखडा आणि प्रशासकीय इमारतीचं भूमिपूजन, रस्ते कामांचा शुभारंभ पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

दरम्यान, यंदा साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. त्यानुसार साखर कारखान्यांनी आणि आयुक्तालयानं कार्यवाही करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. आगामी सण, आणि राज्य विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन, ऊस गळीत हंगाम सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून गाळप हंगामाची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि देवगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता ही सेवा या या स्वच्छता पंधरवड्यानिमित्ताने मानवी साखळी करत विद्यार्थ्यांना एकतेचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख रवींद्र जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचालिका डॉ. सोनाली क्षीरसागर, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर आणि कर्मचारी उपस्थित होते. मानवी साखळीद्वारे भारताचा नकाशा साकारण्याच्या या उपक्रमात तेराशे विद्यार्थी सहभागी झाले.

****

माजीमंत्री तथा लातूरचे आमदार अमित देशमुख यांनी आज लातूर इथल्या बार्शी रोडवरील मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला भेट देत छत्रपती शाहू महाराज प्रशिक्षण आणि मानव विकास, संशोधन संस्था कार्यालय आणि वसतिगृह, अभ्यासिका, ग्रंथालय, प्रशिक्षण केंद्र इमारत बांधकामांची पाहणी केली. काम वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

****

परभणी जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. छत्रपती संभाजीनगर शहर परिसरातही आज पावसाच्या जोरदार सरी कोसळल्या. परभणी, नांदेड, हिंगोली, बीड या चार जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, उद्याही मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या हवामान विभागाचे डॉ. कैलास डाखोरे यांनी व्यक्त केला आहे. या दोन दिवसांदरम्यान सोयाबीन काढणी करतांना पावसामुळे पिकांचं नुकसान होणार नाही, याची दक्षता शेतकऱ्यांनी घ्यावी, तसंच पशुधन सुरक्षित स्थळी बांधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

****

बीड जिल्ह्यातलं मांजरा धरण ९० टक्क्यांहून अधिक भरलं आहे. आवक वाढल्यास कोणत्याही क्षणी धरणातून पाणी सोडण्यात येईल असं पाटबंधारे विभागाचे धनेगाव इथले शाखा अधिकारी सुरज निकम यांनी सांगितलं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथलं जायकवाडी धरणही साडे ९९ टक्क्यांहून अधिक भरलं आहे.

****

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगड राज्यातील नारायणपूर जिल्ह्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी मारले गेले. यात दंडकारण्य झोनल समितीचा सदस्य रुपेश मडावी याचाही समावेश आहे. रुपेश मडावी हा गडचिरोलीच्या अहेरी तालुक्यातील रहिवासी होता. गडचिरोली जिल्ह्यात त्याच्याविरोधात हत्या आणि जाळपोळीसह ६६ गुन्हे दाखल होते. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं.

****

जागतिक पर्यटन दिनानिमित्त २७ सप्टेंबर रोजी धाराशिव जिल्ह्यात तेर इथं हेरिटेज वॉकचं आयोजन करण्यात आलं आहे. तेर इथल्या त्रिविक्रम मंदिरापासून हेरिटेज वॉकची सुरुवात होणार आहे. तेर परिसराचा ऐतिहासिक वारसा पर्यटकांना माहिती व्हावा, आणि जिल्ह्यात पर्यटन वृद्धी व्हावी, या हेतूने पर्यटन जनजागृती संस्थेच्या वतीने हा वॉक घेण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री इथं तहसील कार्यालयात आज दोन जणांनी तहसीलदारांची खुर्ची पेटवून दिली. या प्रकरणी पोलिसांनी मंगेश साबळे आणि वसंत बनसोड या दोघांना ताब्यात घेतलं असून, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू असल्याचं, फुलंब्री पोलिस ठाण्याकडून सांगण्यात आलं. मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात हे आंदोलन करण्यात आल्याचं वृत्त आहे.

****

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीनं ‘स्वच्छता हीच सेवा’ अंतर्गत आज सायकल फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये पर्यावरण रक्षणाचा संदेश देत महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्था आणि सायकल प्रेमी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****